# दुधावरची साय

लेखक - डॉ. बिन्दुमाधव जोशी

उर्मिलाताईनी तारेच्या कुंपणावर जमेल तेवढे तोंड करून संध्याकडे पाहिले; संध्या, tall, beautiful, elegant, त्यांची नात रुबाबात 'चेक-इन-कौंटर' कडे जात होती. त्यांचे ह्रदय कौतुकाने, अभिमानाने भरून आले; न राहवून त्यांनी हाक मारली, 'संध्या, बेटा संध्या'; संध्याने मागे वळून पाहिले. आजीचा चेहरा पाहून तिला काय वाटले कोण जाणे, ती धावत परत आली; आजीला मिठी मारून स्फुंदत म्हणाली, "आजी मला आता जाऊ दे. मला रडायला लावू नको." आजीच्या गालावर ओठ टेकवून ती झटकन परत वळली आणि निश्चयाने जात राहिली. बॅगा चेक-इन करून ती परत आली होती. आजीशी तिने १० मिनिटे गप्पा मारल्या होत्या. 'जपून जा; पोचल्यावर कळव' हे शब्द आजीने १० वेळा उच्चारले होते व 'हो आजी, नको काळजी करू' संध्या उत्तरली होती. Boarding time झालं आणि कष्टाने संध्या आजीची मिठी सोडून निघाली; दोघींनाही हा विरह असह्य झाला होता.

विमानाकडे जाता जाताही थांबून थांबून संध्याने हात वर केला होता; आजीचा हात तर शेवटपर्यंत आशीर्वादाच्या पोझमधे होता. संध्या वळली, तिने अखेरचा हात दाखवला आणि ती अदृश्य झाली. वसंतरावांचा आधार घेत उर्मिलाताई कशाबशा खुर्चीमध्ये बसल्या; वसंतराव न बोलता त्यांच्या पाठीवर हात फिरवत आपलाही आवंढा गिळत होते .....

८ वर्षांपूर्वीचा प्रसंग उर्मिलाताईच्या डोळ्यांसमोर तरळून गेला. त्यांची लाडकी धाकटी लेक अमेरिकेत नोकरी मिळाल्यामुळे तिकडे चालली होती; तिची एकुलती एक लेक संध्या आजी-आजोबा बरोबर पुणे विमानतळावर आईला निरोप देण्यासाठी आली होती. आई विमानाकडे जाईपर्यंत ती नाचत, फुदकत, फुलपाखरासारखी खेळत होती. आई विमानात बसली आणि विमानाने आकाशात झेप घेतली आणि मग तिला जे रडू कोसळले ते थांबता थांबत नव्हते. आजीच्या कुशीत शिरून ती 'आई, आई' अशी स्फुंदत होती; तिचे सारे अंग हुंदक्यानी हादरत होते. उर्मिलाताईंनी ह्रदयाशी धरून कवटाळले; कशी बशी तिची समजूत काढून आजी आजोबा तिला घरी घेवून आले .......

एक वर्षाची असतानाच संध्या आजीबरोबर आजोळी आली होती. घरात दुसरं कोणीच लहान मूल नसल्यामुळे ती आजी आजोबांच्या प्रेमाचं, कौतुकाचं, लाडाचं केंद्रस्थान झाली होती. त्यांचं सर्व विश्व तिच्याभोवती फिरत होतं. बोरनहाण, वाढदिवस, भोंडला -- करता येतील तेवढे सर्व समारंभ उर्मिलाताईनी तिच्यासाठी केले. तिच्या वयाच्या आजुबाजुच्या मुलींना बोलावून त्यांच्याशी खेळण्यात रममाण झालेल्या संध्याकडे पाहत राहणे हा त्यांचा आवडता विरंगुळा. संध्या मोठी झाली तशी तसं बोट धरून तिला देवाला, फिरायला नेणं हा त्यांचा आवडता उद्योग. तिला कंठ फुटला तशी तिची अहर्निश बडबड ऐकताना व त्यांच्या शेजाऱ्याशी तिचे तासन तास कौतुक करताना उर्मिलाताईना व वसंतरावाना कंटाळा येत नसे.

ज्योती - संध्याची आई - दिवसभर ऑफिसमध्ये कामाला जाई; काही वेळा ऑफिसच्या कामासाठी तिला ४/५ दिवस पुणे मुंबईला जावे लागे, त्यावेळी संध्या आईची जराही खंत न करता आजीच्या सहवासात असे व त्यांचंही तिच्याकडे सतत घारीसारखे लक्ष असे. तिला त्या जराही दृष्टीआड होऊ देत नसत.

४ वर्षांची झाल्यावर संध्या बालवाडीस जाऊ लागली. रोज सकाळी तिला उठवून, दूध पाजून, आंघोळ घालून, स्वच्छ कपडे अंगावर चढवून, खाण्याचा डबा पिशवीत घालून उर्मिलाताई तिच्या बरोबर शाळेत जायच्या; रोज तिची काळजी घेण्याची, खाण्यापिण्याची सूचना शिक्षिकेला देऊन परत यायच्या. अडीच वाजता शाळा सुटण्याच्या वेळी त्या तिला घ्यायला शाळेत जायच्या आणि संध्याची गोड बडबड ऐकत दोघीजणी थाटात घरी परतायच्या. वसंतराव चेष्टेने उर्मिलाताईना म्हणायचे, 'अहो, घरात मी पण आहे, आमच्याकडे पण जरा लक्ष राहू द्या'. संध्याकाळी उर्मिलाताई दत्तमंदिरात प्रवचन, कीर्तन ऐकायला जायच्या आणि वसंतरावांचं बोट धरून संध्या गावभर भटकून यायची.

बोरगाव तसं अगदी लहान नव्हतं. १०-१२ हजार वस्तीचं तालुक्याचं मुख्य ठिकाण होतं. पण संध्या गावातल्या साऱ्या लहानथोरांची ओळखीची झाली होती. छान छान कपडे घालून, गोड बड्बड करत, शर्ले टेंपल सारखी सुंदर दिसणारी संध्या रस्त्यावरून जाऊ लागली की सारे एक टक तिच्या छोट्या मूर्तीकडे पाहत राहत. ओळखीच्या बायाबापड्या कानावर बोटे मोडून तिची दृष्ट काढत; भेटणाऱ्या सर्व मुली तिच्याशी काहीतरी बोलत. अशी एखाद्या राजकुमारी सारखी संध्या सगळयांच्या कौतुकाचं स्थान झालेली बघितली की उर्मिलाताईंचं ऊर भरून येई. रोज रात्री तिची दृष्ट काढल्याशिवाय त्या जेवत नसत.

एक वर्षातच ज्योती पुण्यातल्या ऑफीसमध्ये हजर झाली व तिच्या पाठोपाठ वसंतराव, उर्मिलाताई व संध्या शाळेचं वर्ष संपताच पुण्यात स्थलांतरित झाले. पुण्याच्या उपनगरात वसंतरावानी एक फ्लॅट घेतला व तिथे सर्व राहू लागले.

थोड्याच दिवसात सारा परिसर उर्मिलाताईंचे नाव विसरला व त्यांना संध्याची आजी म्हणूनच ओळखू लागला. ज्योति सकाळी ८ वाजता ऑफीसमधे जाई. ९ वाजता संध्या रिक्षाने तिच्या के. जी. शाळेत जाऊ लागली व पुण्याच्या या जीवनाला वसंतराव, उर्मिलाताई सहज रुळून गेले. ३ वाजता संध्या घरी परत येई. ज्योती रात्री ७/८ च्या पुढे परत येई. तिच्या कामाच्या रगाड्यात तिला संध्याकडे लक्ष द्यायला फारशी फुरसत नसे. व आजी आजोबांच्यामुळे गरजही नसे. weekend ला मात्र ती लेकीला घेऊन मैत्रीणीकडे किंवा खरेदीला जाई. रात्री झोपायला मात्र आजी आजोबांच्या मधे, दोघांना लाथा मारत संध्या आरामात झोपत असे व त्या दोघांनाही तिचे पाय छातीवर घेऊन झोपावे इतके प्रिय होते. रात्री झोपण्यापूर्वी मच्छरदाणीत शिरलेल्या चुकार डासांना मारणे हा तिचा आवडता छंद होता. मच्छरदाणी निर्मच्छर झाली की रक्त लागलेले हात आजी आजोबांना दाखवत ती बाथरुमकडे जाई व साबणाने हात धुवून तो आजी आजोबांच्या नाकावर

दाबत गादीवर परत येई. आजोबांच्या कडून गोष्ट ऐकत ऐकत झोपणे हा तिचा रोजचा आवडता उपक्रम होता. आजोबांच्या कडून ऐकून ऐकून सारे रामायण, महाभारत, हातिमताई, गुलबकावलीची गोष्ट, बिरबलाच्या चतुरकथा तिला पाठ झल्या होत्या. तिला रोज एक नवी गोष्ट लागत असे. आधी झालेली गोष्ट सुरू झाली की ती लगेच म्हणे, 'आजोबा ही गोष्ट झाली, दुसरी सांगा'. आजोबांचा स्टॉक संपल्यामुळे त्यांना नवीन गोष्टी रचाव्या लागत किंवा आठवाव्या लागत. पुण्यातही संध्या उर्मिलाताईंचे लिंब लोणचे होते; सदैव बरोबर; फोनवर सुद्धा संध्याची आजी म्हटले की सगळयांना त्यांची ओळख पटत असे.

ज्योती अमेरिकेला गेली त्यावेळी संध्या दुसरीत होती. जानेवारी महिना होता. एप्रिल मध्ये तिची परीक्षा झाली की तिचा रिझल्ट घेऊन मे मध्ये आजी आजोबांना तिला बरोबर घेऊन अमेरिकेत जावे लागले. तिला तिच्या आईच्या हाती सोपवून ते दोघे पुण्यात परत आले. संध्याची पोकळी त्यांना खूप काळ जाणवत राहिली. नंतर ३ वेळा ते दोघेही अमेरिकेत तिच्या सुटीत तेथे राहून आले; २ वेळा ती आईबरोबर पुण्यात येऊन राहिली. अमेरिकेत ती आता चांगलीच रुळली होती. तेथील आवडी निवडी, fashions तिने उचलल्या होत्या. खेळात, अभ्यासामध्ये, नाच, गाणी, पोहणे या अवांतर गोष्टीतही तिने प्राविण्य संपादन केले होते. दर आठवड्याला इ-मेल किंवा फोनवरून आजीला सगळया आठवड्याचा रिपोर्ट द्यायचा हे एकदाही चुकले नव्हते.

अशी आठ वर्षे लोटली. संध्या आता १० वीला गेली होती. दोन वर्षे तिला आता भारतात येणे जमणार नव्हते म्हणून ती एकटीच उन्हाळी सुटीत आजीला भेटायला आली होती. निर्धास्त ती सिंगापूर मार्गे आली; महिनाभर राहिली व आज ती परत आईकडे चालली होती; एकटीच. २४ तासांचा विमान प्रवास, सिंगापूरचा ३ तासांचा हॉल्ट, सगळं निर्भयपणे करून जाणार होती.

एक महिन्यापूर्वी ती आली त्या वेळी वसंतराव, उर्मिलाताई तिला घ्यायला सहार विमानतळावर आले होते. रात्री साडे अकरा वाजता तिचे विमान उतरले आणि तासाभरात सामानाची ट्रॉली ढकलत येणारी तिची मूर्ती उर्मिलाताईंना दिसली. त्यांनी हात केला आणि त्या पुढे झेपावल्या. त्यांना पाहताच संध्याने ट्रॉली तिथेच सोडली व धावत येऊन आजीला मिठी मारली.

महिनाभर सतत आजीच्या सहवासात हिंडत, फिरत, shopping करत, लाड करून घेत संध्या सुखावली होती. आजीने कौतुकाने दिलेले ड्रेसेस, खाऊ बॅगेत भरून आज ती परत चालली होती. ६ वर्षांची चिमुरडी संध्या, शाळेतून overload झालेल्या रिक्षेतून परत आली की खालूनच 'आजी' म्हणून जोरात हाक मारायची आणि जिना चढता चढता शाळेतील गंमती जमती संगायची; पण रोज तिची एक तक्रार असायची, "आजी मला ही रिक्षा नको. ती प्रीती मला पाय लावते, ती रेखा माझ्या खांद्यावर चापट्या मारते, ती सायली माझे केस ओढते." तीन सीटची क्षमता असलेल्या रिक्षेत ९/१० मुले कोंबून बसवल्यानंतर दुसरे काय होणार? आजी तिची काही वेळा समजूत घालायच्या ---- खुर्चीवर बसल्या बसल्या उर्मिलाताईंच्या डोळयासमोरून हा सारा चित्रपट सरकत होता ...........

आज १४ वर्षांची संध्या - उंच, सुंदर, आकर्षक, confident - आजीला सांगून गेली होती; ’आजी, माझी काही काळजी करू नकोस, मी आरामात जाईन; मी येताना एकटी आले नाही का? don't worry आजी, don''t worry.'

हळुहळू उर्मिलाताई उठल्या; संध्या गेली त्या दिशेला थोडा वेळ पाहत राहिल्या आणि वसंतरावांचा हात धरून चालू लागल्या. त्यांची चिमुरडी संध्या, त्यांची लाडकी नात, १२ वर्षांपूर्वी त्यांचं बोट धरून चालायला शिकलेली संध्या स्वतःच्या पायावर उभी होती. तिच्या आईचा उजवा हात होती. अमेरिकेत सुद्धा scholarship मिळवून आईला आर्थिक मदत करत होती; आपल्या शिक्षणाचा भार आईवर पडू देत नव्हती. डोळ्यातून ओघळलेले आसू उर्मिलाताईनी पुसले आणि त्या चालत राहिल्या; त्यांची दुधावरची साय हळुहळू वरच्या दिशेने प्रगती करत होती; आत्मविश्वासाने, निर्भयपणे.